THE MET LEAGUE OF COLLEGES
**MET** Bhujbal Knowledge City
AS SHARP AS YOU CAN GET
Adgaon, Nashik - 422003 | Tel.: (0253) 2303515 | Mob.: +91 9881100099
e-mail : enquiries@bkc.met.edu | www.metbkc.edu.in
ISO 9001:2015 CERTIFIED
INSTITUTE OF TECHNOLOGY POLYTECHNIC
DTE CODE 5244

### We are Proud of our Alumni !! आम्हांला आमच्या विद्यार्थ्यांचा सार्थ अभिमान आहे.






**Ms. Damini R Nikumbh, Completed Diploma in Mechnaical Engineering from Batch 2015-16 MET's Institute of Technology-Polytechnic, Nashik and** Currently she isworking as an"**Overhauling Engineer" in Component Support Section )Dry Vacuum Pump, Precision Machinery Company** (of **Ebara Corporation, Fujisawa, Japan**.

"२०१८ च्या फूटबॉल विश्व चषक स्पर्धेतील ,जपान आणि कोलंबिया यांच्यातील सामन्यानंतरचा एक प्रसंग. कोलंबिया हा त्या आधीच्या विश्व चषक स्पर्धेत ,उपांत्यपूर्व फेरीत धडक मारून आलेला तगडा संघ. त्या तुलनेत जपानचा संघ अगदीच नवखा . पण त्या दिवशी जपानने कोलंबियाला चक्कं २-१ अशा गोल फरकाने हरवत इतिहासच घडवला. या धक्कादायक विजयनानंतर , जपानी प्रेक्षकांनी मैदानात मोठा जल्लोष केला. विजयानतंरचा हा बेभान व बेफाम जल्लोष भारतीयांच्या नित्य परिचयाचाच. पण नवीन होतं ते त्यानंतरचं जपानी प्रेक्षकांचं वर्तन . साग्र संगीत विजयोत्सव साजरा झाल्यानंतर मैदानातून बाहेर पडतांना , उपस्थित सर्व वयोगटांतील जपानी प्रेक्षकांनी उत्स्फूर्तपणे मैदानांत इतस्ततः पडलेल्या प्लास्टिक च्या बाटल्या , पॉपकॉर्न ,बिअर चे ग्लास , बिस्कीट आणि चॉकोलेट पुड्यांचे कागद हे सगळं उचललं . संपूर्ण परिसर स्वच्छ झाल्याची खात्री झाल्यानंतरच जपानी प्रेक्षक मैदानांतून बाहेर पडले. "

"एकदा एका जपानी आस्थापनेतील एक कर्मचारी, आपल्या कामकाजाच्या निर्धारीत वेळेपेक्षा २० मिनिटे लवकर घरी परतला, तर त्याच्या पत्नीने त्याला दरवाजाच्या बाहेरच थांबवून, घरात येण्यास मनाई केली. कारण त्यानें २० मिनिटे लवकर घरी येऊन कामाचे तास वाया घालवित ,आस्थापनाचे व पर्यायाने राष्ट्राचे आर्थिक नुकसान करून, नैतिक प्रतारणा केली होती ,जो जपानमध्ये एक प्रकारचा राष्ट्र द्रोहच समजला जातो."

हे दोन प्रसंग , उगवत्या सूर्याची भूमी (Land of rising sun ) म्हणून ओळख असलेल्या जपानी संस्कृतीची व कार्यशैलीचे दर्शन घडवतात . जपानी कुटुंबात मुलं ही केंद्रस्थानी असतात आणि त्यांच्या परिपूर्ण विकासावर भर देण्यात येतो शिक्षणाविना कुठल्याही समुहातील एकही कुटुंब निरक्षर राहणार नाही , यांवर बारकाईने लक्ष दिलं जातं . त्याचमुळे साक्षरतेच्या बाबतीत जागतिक क्रमवारींत जपान आघाडीवर आहे.

हे सर्व आठवण्याचे कारण ,नुकतीच आमच्या मेट पॉलीटेकनिक च्या यंत्र अभियांत्रिकी विभागातील शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये संस्थेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली विद्यार्थीनी कु. दामिनी रंगनाथ निकुंभ हीने सदिच्छा भेट दिली. ती सध्या, जपानच्या राजधानी टोकियो येथे एबारा कॉर्पोरेशन (Ebara Corporation )मध्ये फुजीसावा (Fujisawa ) येथे कार्यरत आहे. तिच्या या भेटीत, जपानबद्दल असलेल्या

आपल्या माहीतीत, तिच्यासारख्या प्रत्यक्ष दर्शीकडून मिळणाऱ्या अनुभवांची भर घालण्यात विभागांतील शिक्षक व कर्मचारी उत्सुक दिसत होते. ती ज्या संस्थेत काम करते,

त्या संस्थेबद्दल आणि तेथील एकूणच कार्य पद्धतीबद्दलचे अनुभव तिने मांडले. जपानमध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामांतील गुणवत्तेनुसार बढती दिली जाते तसेच संस्थेच्या प्रत्येक लहान मोठ्या निर्णयांत शीर्षस्थ व्यवस्थापकांपासून तळाच्या कामगारांपर्यंत सर्वांना सामावून घेतले जाते, असं निरीक्षण तिने नोंदवलं .

दामिनी ही तीन भावंडातील सर्वात धाकटी (शेंडेफळ ). योगाची आणि आनंदाची बाब म्हणजे हे तीनही भावंडं मेट पॉलीटेकनिक च्या मेकॅनिकल विभागाचे विद्यार्थी . दहावीला उत्तम गुण मिळवूंन मोठया भावाच्या पावलावर पाऊल टाकीत, तिनेही मेकॅनिकल शाखेत प्रवेश घेवून अतंत्य मेहनतीने व चिकाटीने अभ्यासाला सुरुवात केली. जिद्द , मेहनत , विजिगिषु वृत्ती अभ्यासातील सातत्य , स्थिरबुद्धी व एकाग्रता आणि सर्वात महत्वाचं म्हणजे शिक्षकांबद्दलचा आदर, या तिच्यातील उपजत गुणांमुळे, तिने डिप्लोमाच्या तीनही वर्षांत, विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होवून , त्यातही बऱ्याच विषयांत पैकीच्या पैकी गुण मिळवण्याची कामगिरी केली. बऱ्याचदा चांगल्या विद्यार्थ्यांची लक्षणें कोणती ?असं विचारल्यावर उत्तर असतं ,"चांगला विद्यार्थी म्हणजे असा विदयार्थी जो , चांगल्या शिक्षणाकडून तर ज्ञान मिळवतोच, परंतु तो वाईट शिक्षकाकडून देखील; स्वतःला हवं ते शिकून घेतो. दामिनी अशाच चांगल्या विद्यार्थ्यांपैकी एक "good listner " आहे , असं मला वाटतं..

डिप्लोमाच्या तिसऱ्या वर्षाला, ९१ % गुण मिळवून, दामिनीने राज्यस्तरावरील मेरिट नुसार, कॉलेज ऑफ इंजिनीरिंग, पुणे (COEP ) या नामांकीत संस्थेत, इंजिनीरिंगच्या थेट दुसऱ्या वर्षात B. Tech. (Mechanical ) या शाखेत प्रवेश मिळवला. १० वी व डिप्लोमानंतर प्रथमच, घर सोडून, कुटुंबाशिवाय, एकटीनेच बाहेर राहण्याचा प्रसंग. अशा वेळी होम सिकनेसमुळे , अभ्यासाकडे दुर्लक्ष होवून , वर्ष वाया जाण्याची भीती असते. परंतु तिथेही तिने, अतिशय मेहनतीने व चिकाटीने नवीन अभ्यासक्रमाशी व वातावरणाशी जुळवून घेत,आपल्या पालकांना सुखद धक्का दिला. COEP तही तिने, अभ्यासक्रमासोबतच, इतर एक्स्ट्रा curricular activities मध्येही सहभागी होऊन आपला शैक्षणिक आलेख उंचावत राहील याची दक्षता घेतली. पदवीच्या शेवटच्या वर्षी ,झालेल्या कॅम्पस recruitment मध्ये, आपल्या मेरीटवर , परदेशातील चांगल्या पॅकेजची नोकरी मिळवण्यात यश आले आणि तिच्या यशस्वी व्यावसायिक कारकीर्दीला सुरुवात झाली. पु. लं . च्या "अंतु बर्वा " या गाजलेल्या व्यक्तिचित्रांत पु. ल. विदेशांत जायला निघण्यापूर्वी ,अंतु बर्वा यांचा आशीर्वाद घेण्यासाठी त्यांना वाकून नमस्कार करतात, तेव्हा अंतु बर्वा त्यांना आशीर्वाद देतांना म्हणतात , "आयुष्यमान व्हा !, श्रध्दाळू आहांत म्हणून यश आहे हो तुम्हांला !!".

त्याच धर्तीवर, दामिनीला सांगावंसं वाटतं की , स्वभावातील साधेपणा , नम्रता ,जिद्द व विजिगिषु वृत्ती यांच्या जोरावर, आजपर्यंत मिळालेल्या यशाप्रमाणेच, भावी आयुष्यातील यशाच्या पायऱ्या ती सहज पार करून आई वडिलांची स्वप्नं साकार करेन.

**अमोल पुरुषोत्तम वडनेरे ,**
विभागप्रमुख - यंत्र अभियांत्रिकी विभाग ,
मेट पॉलीटेकनिक-भुजबळ नॉलेज सिटी , नाशिक .

MECH | Spandan |

Bhujbal Knowledge City, IOT-Polytechnic